**बी. ए. भाग–१ (शिक्षणशास्त्र)**

**सत्र १ : घटक १**

# शिक्षणाचे प्रकार

(Types of Education)

**अनुक्रमणिका**


१.१ प्रस्तावना

१.२ शिक्षणाचे प्रकार

१.३ औपचारिक शिक्षण

१.३.१ औपचारिक शिक्षण अर्थ

१.३.२ औपचारिक शिक्षणाची वैशिष्ट्ये

१.३.३ औपचारिक शिक्षणाचे महत्त्व

१.३.४ औपचारिक शिक्षणाचे घटक

१.३.५ औपचारिक शिक्षणाच्या मर्यादा

१.३.६ स्वयंमूल्यमापनासाठी प्रश्न

१.४ अनौपचारिक शिक्षण

१.४.१ अनौपचारिक शिक्षणाचा अर्थ

१.४.२ अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व

१.४.३ अनौपचारिक शिक्षणाचे घटक

१.४.४ अनौपचारिक शिक्षणाचे फायदे

१.४.५ अनौपचारिक शिक्षणाच्या मर्यादा

१.४.६ स्वयंमूल्यमापनाचे प्रश्न

१.५ सहज शिक्षण

१.५.१ सहज शिक्षणाचे अर्थ

१.५.२ सहज शिक्षण वैशिष्ट्ये

१.५.३ सहज शिक्षणाचे महत्त्व

१.५.४ सहज शिक्षणाचे घटक

१.५.५ सहज शिक्षणाचे फायदे

१.५.६ स्वयंमूल्यमापनासाठी प्रश्न

१.६ उपसंहार

१.७ स्वयंमूल्यमापनासाठी प्रश्न

१.८ संदर्भ ग्रंथ

## १.१ प्रस्तावना

शिक्षण ही आजन्म चालणारी व्यापक अशी प्रक्रिया आहे. समाजातील सर्व स्तरांवरील व्यक्तींना शिक्षण घेण्याचा सांविधानिक हक्क आहे.

शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या वर्तनामध्ये व जीवनामध्ये धनात्मक, रचनात्मक बदल सावकाशपणे घडून आणणारी प्रक्रिया.

शिक्षण अशी एक महत्त्वाची गोष्ट आहे की जीच्यामुळे व्यक्तीला काय बरोबर व काय चूक यांमधील फरक समजतो.

शिक्षणामुळे व्यक्तीचे ज्ञानसंवर्धन होते, वाचन लेखन सुधारते, बौद्धिक विकास होतो, निर्णय घेण्याच्या क्षमतेचा विकास होतो, कौशल्ये विकसित होतात, योग्य दृष्टीकोन विकसित होतो. शिक्षणामुळे वेगवेगळ्या व्यक्तींच्या संपर्कात आल्यामुळे विचारांची देवाणघेवाण होते.

शिक्षणामुळे समाज, देश, जगाविषयीचे ज्ञान एका पिढीपासून दूसऱ्या पिढीपर्यंत संक्रमित होते.

थोडक्यात सांगायचे झाले तर Education is the passage to progress.

## १.२ शिक्षणाचे प्रकार

शिक्षण हे केवळ शाळेमध्ये, चार भिंतीच्या वर्गामध्येच घडते असे नाही, शाळाबाह्य जगाच्या अनुभवातून, स्वत:च्या निरीक्षणातून, अवतीभोवती घडणाऱ्या घटनांमधून देखील घडत असते. त्याचप्रमाणे शाळेमधून शिकविले जाणारे विविध विषय, शाळाबाह्य उपक्रम, अभ्यासपूरक उपक्रम या सर्वांमधून विद्यार्थी घडत असतो, शिकत असतो.

शिक्षण देण्याच्या आणि घेण्याच्या पद्धतीवरून शिक्षणाचे औपचारिक, अनौपचारिक आणि सहज शिक्षण असे तीन प्रकार पडतात. ते आता आपण सविस्तर अभ्यासू

**शिक्षणाचे प्रकार**

१) औपचारिक शिक्षण (Formal Education) २) अनौपचारिक शिक्षण (Non Formal Education)

३) सहज शिक्षण (Informal Education)

## १.३ औपचारिक शिक्षण

औपचारिक शिक्षण शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यांसारख्या शैक्षणिक संस्थामधून दिले जाते.

औपचारिक शिक्षणाची सुरवात प्राथमिक शाळांपासून होते व याची ध्येये पूर्वनियोजित असतात. व्यक्तीच्या, समाजाच्या गरजांमधून औपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण होतात.

विशिष्ट यंत्रणेमार्फत, निश्चित ध्येय समोर ठेवून नियोजन पूर्वक दिल्या जाणाऱ्या शिक्षणास औपचारिक शिक्षण म्हणतात.

नियोजनबद्ध, साचेबंद, अलवचिक शिक्षण म्हणजे औपचारिक शिक्षण.

औपचारिक शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यास शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घ्यावा लागतो. प्रवेश घेण्याचे काही नियम, अटी असतात. (उदा. वय, शिस्त), अभ्यासक्रमाची निवड करावी लागते. (उदा. प्राथमिक, माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर स्तर इ.)

यापैकी प्रत्येक स्तराचा अभ्यासक्रम, ध्येये, उद्दिष्टे असतात व ती लक्षात घेऊन अध्ययन-अध्यापन करावे लागते.

औपचारिक शिक्षण समोरा समोर (Face to face) दिले जाते. विद्यार्थी, शिक्षक, पालक, समाज एकंदरित शिक्षण प्रक्रियेबाबत जागरुक असतो. या शिक्षणाच्या विविध शाखा असतात. (उदा. कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे, भाषा इ.)

### १.३.२ औपचारिक शिक्षणाची वैशिष्टे:

वरील मुद्यांचा विचार करता औपचारिक शिक्षणाची वैशिष्ट्यो खालीलप्रकारे सांगता येतील.

१. औपचारिक शिक्षण शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, व्यावसायिक शिक्षण संस्था यांमधून दिले जाते.

२. औपचारिक शिक्षण शास्त्रशुद्ध, पद्धतशीर व पूर्वनियोजित असते.

३. औपचारिक शिक्षणामध्ये वेळापत्रक, अध्यापन पद्धती, विद्यार्थी, शिक्षक, शैक्षणिक व्यवस्थापन, प्रशासन यांना महत्त्व असते.

४. औपचारिक शिक्षणामध्ये अध्ययन-अध्यापन प्रक्रिया जाणीवपूर्वक चालतात.

५. औपचारिक शिक्षणामध्ये विविध विषयांचे नियोजित शिक्षण असते.

६. औपचारिक शिक्षणामध्ये वेगळ्यावेगळ्या शिक्षणाच्या टप्प्यांवर परीक्षा घेतल्या जातात व त्यांना अत्यंत महत्त्व असते.

७. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर गुणपत्रके, प्रमाण पत्रे विद्यार्थ्यांना दिली जातात.

८. औपचारिक शिक्षणामध्ये प्रत्येक विषयाचा विशिष्ट पाठ्यक्रम असतो व तो विशिष्ट कालावधीत पूर्ण करावा लागतो.

९. औपचारिक शिक्षणामध्ये निश्चित केलेली फी विद्यार्थ्यांना करावी लागते.

१०. नियम व शिस्त यांना महत्त्व असते.

११. परीक्षा उत्तीर्ण, अनुत्तीर्ण, पदवी यांना महत्त्वाचे स्थान असते.

१२. औपचारिक शिक्षण देण्यासाठी शिक्षकांकडे ठराविक शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता असावी लागते.

१३. शैक्षणिक संस्थांची विशिष्ट धोरणे, नियम, शिस्त, अटी असतात.

१४. औपचारिक शिक्षण देण्यासाठी विशिष्ट नियम, कायदे व अटी असतात.

१५. औपचारिक शिक्षणाला व्यावहारिक जीवनामध्ये अत्यंत महत्त्व असते.

१६. औपचारिक शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना नोकरीच्या व व्यवसायाच्या विविध संधी उपलब्ध होतात.

१७. औपचारिक शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना अनेक टप्प्यांवर स्पर्धांना तोंड द्यावे लागते.

**१.३.३ औपचारिक शिक्षणाचे महत्त्व:-**

१. औपचारिक शिक्षणामुळे समाजाच्या शिक्षणविषयक गरजा पूर्ण होतात.

२. औपचारिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना शास्त्रशुद्ध विचार करण्याची व जीवनाकडे तार्किक दृष्टीने पाहण्याची सवय लागते.

३. औपचारिक शिक्षण हे शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ यांसारख्या संस्थामधून दिले जात असल्यामुळे जर एखाद्या विद्यार्थ्यास शैक्षणिक समस्या निर्माण झाल्यास त्यांचे निराकरण करण्याची सोय उपलब्ध असते.

४. औपचारिक शिक्षणामध्ये विद्यार्थी व शिक्षक समोरासमोर व एकत्रित असतात त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन अनुभवांनुसार अध्यापन कार्यनितींमध्ये बदल करता येतो व शिक्षणाचे ध्येये, उद्दिष्टे साध्य होण्यास मदत होते.

५. औपचारिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना प्राविण्य मिळाल्यास पदवी व प्रमाणपत्र बहाल केले जाते. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढतो.

५. औपचारिक शिक्षणामुळे समाजाला विविध क्षेत्रातील प्रतिभावंत, तज्ञ, प्रशासक, अभियंता, वैद्य इ. मिळतात.

### १.३.४ औपचारिक शिक्षणाचे घटक

औपचारिक शिक्षणाचे घटक खालील आकृतीद्वारे तुमच्या लक्षात येईल.

**औपचारिक शिक्षणाचे घटक**

- विद्यार्थी
- शिक्षक
- शाळा
  - महाविद्यालये
  - विद्यापीठे
  - व्यावसायिक शिक्षण संस्था
- अध्यापन पद्धती
- पुस्तके
- अभ्यासक्रम
- अभ्यास
- वेळापत्रक
- परीक्षा

### १.३.५ औपचारिक शिक्षणाच्या मर्यादा

औपचारिक शिक्षणाचे महत्त्व, वैशिष्टे इत्यादीचे तुम्हाला आकलन झाल्यानंतर याच्या काही मर्यादा देखील आहेत. त्या खालीलप्रमाणे

१. औपचारिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी विशिष्ट टप्पे/स्तर पूर्ण करावे लागतात. वर्गामध्ये अध्यापन पद्धती सरासरी बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी बहुतांशी वापरल्या जातात. त्यामुळे वर्गातील हुशार, बुद्धिमान, प्रतिभावंत विद्यार्थ्यांची कुचंबना होते. त्यांना हे शिक्षण हे कंटाळवाणे वाटते. पुढील इयत्तेत, स्तरावर जाण्यास वेळ लागतो. वाट पाहावी लागते.

२. वर्गामध्ये चांगल्या व वाईट गुणांचे विद्यार्थी असतात. काही वेळेला चांगले विद्यार्थी देखिल बिघडण्याची शक्यता असते.

३. औपचारिक शिक्षण घेणाऱ्यांची संख्या भरपूर असते. त्यांना शिक्षकाकडून मिळणारी प्रेरणा अपुरी पडते, आर्थिक मदत कमी पडते.

४. काही शैक्षणिक व व्यावसायिक संस्था अप्रमाणित असतात व विद्यार्थ्यांनी अशा संस्थांमध्ये प्रवेश घेतल्यास त्यांच्या पदरी निराशा पडते.

५. औपचारिक शिक्षण देण्यासाठी फी आकारली जाते. काही विनाअनुदानित, खाजगी शिक्षण संस्थांमधून भरमसाठ capitation fee, देणगी आकारली जाते.

### १.३.७ स्वयंमूल्यमापनासाठी प्रश्न (औपचारिक शिक्षण)

प्र. १) रिकाम्या जागा भरा.

१) औपचारिक शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ..................... मध्ये प्रवेश घ्यावा लागतो.

२) औपचारिक शिक्षण ............................ मार्फत दिले जाते.

३) औपचारिक शिक्षण .................. असते.

४) औपचारिक शिक्षणामध्ये .................. ला महत्त्व असते.

५) औपचारिक शिक्षण देण्यासाठी शिक्षकांकडे .................. असावी लागते.

**उत्तरे :–**

१) शाळा, महाविद्यालये, विद्यार्थी.

२) प्रशिक्षित शिक्षक

३) लवचिक, पूर्वनियोजित

४) अभ्यासक्रम, वेळापत्रक, शिस्त.

५) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता.

प्र.२) औपचारिक शिक्षणाचे स्वरूप स्पष्ट करा.

प्र.३) औपचारिक शिक्षणाचे फायदे लिहा.

## १.४ अनौपचारिक शिक्षण

अनौपचारिक शिक्षण हे औपचारिक शिक्षणास पूरक असते. व्यक्ती त्याच्या सोयीनुसार, फावल्या वेळेस शिक्षण घेऊ शकतात, औपचारिक शिक्षणाची जी बंधने असतात. उदा. शाळेत, महाविद्यालये इ. उपस्थित राहाणे, शिक्षक व विद्यार्थी यांचे समोरासमोर अध्यापन चालणे ही बंधने अनौपचारिक शिक्षणामध्ये नसतात, त्यामुळे नोकरी, व्यवसाय, घरकाम करून हे शिक्षण पूर्ण करता येते. गृहशिक्षण, वैयक्तिक अनुदेशन, दूरस्थ शिक्षण, संगणक सहाय्यक शिक्षण इत्यादींचा अनौपचारिक शिक्षणामध्ये समावेश होतो.

### १.४.१ अनौपचारिक शिक्षणाचा अर्थ

ज्या प्रकारच्या शिक्षणामध्ये औपचारिक शिक्षणाची बंधने नसतात, व्यक्ती आपल्या सोयीनुसार शिक्षण घेऊ शकते व ते औपचारिक शिक्षणास पूरक ठरते ते अनौपचारिक शिक्षण होय.

### १.४.२ अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व

अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. काही मूलभूत कौशल्ये, व्यावसायिक कौशल्ये की जी औपचारिक शिक्षणामधून दिले जात नाही ती अनौपचारिक शिक्षणामुळे देता येतात.

२. अनौपचारिक शिक्षण, औपचारिक शिक्षण देण्यासाठी पूरक असते.

३. व्यक्तीच्या काही विशिष्ट गरजा असतात. त्या औपचारिक शिक्षणामधून पूर्ण होऊ शकत नाहीत. उदा. भावनिक विकास, शारीरिक विकास इ. हे घरामध्ये किंवा काही अनौपचारिक शिक्षण देण्याच्या संस्था कडून दिले जाते. (उदा. संगणक शिक्षण देण्याऱ्या संस्था, धार्मिक शिक्षण इ.)

### १.४.३ अनौपचारिक शिक्षणाची वैशिष्टे

१. अनौपचारिक शिक्षणामध्ये शिक्षण देणारा आणि शिक्षण घेणारा हे घेणारे हे एकमेकांपासून अनेक वेळा दूर अंतरावर असतात.

२. अनौपचारिक शिक्षण हे समूह संपर्क माध्यमे, मुक्त विद्यापीठ संस्था यांच्या माध्यमातून देण्यात येते.

३. अनौपचारिक शिक्षणामुळे ज्ञान व कौशल्यांमध्ये वाढ होण्यास मदत होते.

४. अनौपचारिक शिक्षण हे औपचारिक शिक्षण व सहज शिक्षण यांच्या दरम्यानचे शिक्षण आहे.

५. अनौपचारिक शिक्षणामध्ये देखील अभ्यासक्रम, परीक्षा, पदव्या याचे महत्त्व असते.

६. अनौपचारिक शिक्षण हे पूर्वनियोजित असते व पारंपारिक शाळा/संस्था यांच्या बाहेर घडते.

७. वेळापत्रक व अभ्यासक्रम लवचिक असतो, प्रसंगानुसार बदलता येतो. समायोजित करता येतो.

८. अनौपचारिक शिक्षण मुख्यत: व्यावहारिक व व्यावसायिक शिक्षणाकरिता दिले जाते. (उदा. ब्युटी पार्लर कोर्स)

९. वयाची मर्यादा नसते.

१०. अनौपचारिक शिक्षणाला वयाची अट नसते.

११. संपूर्ण वेळ अथवा अर्धवेळ दिले जाते, त्यामुळे कमविणे व शिकणे एका वेळेस शक्य होते.

### १.४.४ अनौपचारिक शिक्षणाचे फायदे

अनौपचारिक शिक्षणाचे फायदे खालील प्रमाणे सांगता येतील.

१. ज्यांना वेळे अभावी औपचारिक शिक्षण घेणे शक्य नव्हते किंवा नसते अशा व्यक्तींसाठी अनौपचारिक शिक्षण फायद्याचे असते.

२. अनौपचारिक शिक्षणामुळे फावल्या वेळेचा सदुपयोग होतो.

३. अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून मिळविलेल्या पदवीचा वापर मर्यादित प्रमाणात नोकरीसाठी, पदोन्नतीसाठी होतो. उदा. सेवेत असलेले शिक्षक मुक्त विद्यापीठाचे सुट्टीतील B. Ed., M. Ed. नोकरी करता करता पूर्ण करू शकतात.

४. अनौपचारिक शिक्षणामुळे आपले छंद जोपासता येतात. उदा. संगीत-शिक्षण देणाऱ्या संस्था.

५. ज्ञानात भर पडते. उदा. शेती शिक्षण.

६. वेळ, अभ्यासक्रम व वय यांमध्ये लवचिकता.

७. नियमित परीक्षा घेण्याची गरज नाही.

८. अनौपचारिक शिक्षणामध्ये स्वयंअध्ययनावर भर

९. अनौपचारिक शिक्षण ही मुक्त शिक्षण प्रणाली आहे की ज्यामध्ये सार्वजनिक व वैयक्तिक क्षेत्रांचा समावेश.

**१.४.५ अनौपचारिक शिक्षणाचे घटक**

अनौपचारिक शिक्षणाचे घटक खालीलप्रमाणे दाखविता येतात.

**अनौपचारिक शिक्षणाचे घटक**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| मुक्त विद्यापीठ संस्था | ग्रंथालय | संगणक शिक्षण देणाऱ्या संस्था | समूह संपर्क माध्यमे (T.V., Internet etc) | शिक्षक | विद्यार्थी | परीक्षा प्रमाणपत्रे. |

**१.४.६ अनौपचारिक शिक्षणाच्या मर्यादा**

अनौपचारिक शिक्षणाच्या मर्यादा खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. अनौपचारिक शिक्षणासाठी नियम, अटी, बंधने नसल्यामुळे त्यामध्ये शिथिलता असते.

२. अनौपचारिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीची हमी देता येत नाही.

३. अनौपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील अभ्यासक्रम शासनमान्य किंवा प्रमाणित नसेल तर विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या संधी फारच थोड्या उपलब्ध होतात.

४. अनौपचारिक शिक्षण पूर्ण करण्यास वेळ लागतो. कारण ठराविक वेळेस पूर्ण करण्याची अट नसते.

५. शिक्षक-विद्यार्थी फारच थोडा वेळ एकमेकांसमोर असल्यामुळे त्यांच्यामध्ये आंतरक्रिया फार कमी होत असते.

६. उपस्थिती अनिवार्य नसते.

७. व्यावसायिक व प्रशिक्षित शिक्षक आवश्यक नसतात.

८. अनौपचारिक शिक्षण प्रशिक्षितच शिक्षक पाहिजेत असे नाही, पारंपारिक कौशल्ये प्राप्त होते ते देखील हे शिक्षण देऊ शकतात.

९. अनौपचारिक शिक्षणामधून विद्यार्थी किंवा व्यक्ती नियमित विद्यार्थीसारखा शिक्षण घेण्याचा आनंद घेऊ शकत नाहीत.

१०. आत्मविश्वास कमी पडतो.

११. काही वेळेस काही व्यावसायिक शिक्षण संस्था खोटी प्रमाणपत्रे देतात तेव्हा व्यक्तीची फसवणूक होते.

१२. शासन किंवा तत्सम संस्थांचे नियंत्रण नसते.

१.४.७ स्वयंमूल्यमापनाची प्रश्न (अनौपचारिक शिक्षण)

१) अनौपचारिक शिक्षण ............... मार्फत दिले जाते.

२) अनौपचारिक शिक्षणामुळे ................ चा सदुपयोग होतो.

३) सेवेत असलेल्या शिक्षकांना पदोन्नतीसाठी ................. शिक्षण उपयुक्त ठरते.

४) अनौपचारिक शिक्षणामुळे .................... जोपासता येतात.

५) अनौपचारिक शिक्षणामध्ये उपस्थिती ................... असते.

उत्तरे:-

१) मुक्त विद्यापीठ, संगणक शिक्षण संस्था इ.

२) फुरसदीच्या वेळेचा

३) अनौपचारिक शिक्षण

४) छंद

५) अनिवार्य.

**१.५ सहज शिक्षण**

सुरवातीस आपण पाहिले की शिक्षण ही सातत्याने चालणारी, आजन्म अशी प्रक्रिया आहे. व्यक्ती जन्मापासून ते मरेपर्यंत सतत नविन अनुभव घेत असते. या अनुभवांमधून व्यक्तीच्या वर्तनात फरक पडतो. शिक्षणातून व्यक्ती ज्ञान, कौशल्ये आत्मसात करते.

जीवनातील सर्वच शिक्षण हे आपल्याला शाळा, महाविद्यालय यांमधून मिळत नाही. आपले कुटुंब, मित्र-मैत्रिणी, समाज, समाजातील व्यक्ती, घटना इत्यादींमधून देखील अनेक अनुभव मिळत असतात. उदा. दारापुढे, देवापुढे रांगोळी काढणे, उजव्या हाताने जेवणे, नमस्कार करणे, बटणे लावणे ही साधी-साधी कौशल्ये आपण शाळेत न जाता, कुटुंबामधून, समन्वयकांकडून आत्मसात केलेली असतात.

**१.५.१ सहज शिक्षणाचा अर्थ**

जे शिक्षण जाता-येता व्यक्तीला कुटुंब, मित्र, समाज यांच्या अनुभवांतून शाळेत न जाता मिळते ते सहज शिक्षण होय.

**१.५.२ सहज शिक्षणाचे महत्त्व**

सहज शिक्षणाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. जीवनकौशल्ये, मुल्ये यांचे शिक्षण सहज शिक्षणातून मिळते. त्यामुळे सहज शिक्षण महत्त्वाचे ठरते.

२. सहज शिक्षणामध्ये साचेबंदपणा नसतो. व्यक्ती आपल्या अनुभवांवरून विविध माध्यमांद्वारे हे शिक्षण घेऊ शकतात.

३. सहज शिक्षणामध्ये वेळापत्रक, अभ्यासक्रम, परीक्षा नसतात. या कारणामुळे विद्यार्थ्यांना ताण-तणावाला सामोरे जावे लागत नाही.

४. सहज शिक्षण हे घरातून, कुटुंबातील व्यक्तींकडून, परीचयामधून मिळत असल्यामुळे व्यक्तीला काळ, वेळ किंवा काळाची बंधन नसेल. हे शिक्षण विविध स्त्रोतांच्या माध्यमातून घेता येईल त्यामुळे तुलनात्मक अध्ययन करणे शक्य होते.

५. सहज शिक्षण उत्स्फूर्तपणे घडून येते, त्यामुळे ते आनंददायी दीर्घकाळ स्मरणात राहण्यास मदत होते.

६. शिक्षणामध्ये कोणत्याही प्रकारची औपचारिकता नसते.

७. शिकण्यासाठी विषय नसतात.

८. वेळापत्रक नसते.

९. अभ्यासक्रम ठराविक नसते.

१०. परीक्षा नसतात.

११. दैनंदिन जीवनात विविध प्रसंगातून शिक्षण मिळते.

१२. शिक्षण उत्स्फूर्त, सहज व स्वंयप्रेरित असते.


१३. बिनखर्चाचे असते.

१४. वेगवेगळी तंत्रे वापरता येतात.

**१.५.३ सहज शिक्षणाचे घटक**

सहज शिक्षणाचे घटक खालीलप्रमाणे सांगता येतील.

**सहज शिक्षणाचे घटक**



### १.५.४ सहज शिक्षणाच्या मर्यादा

१. इंटरनेट, समाज माध्यमे, समूह संपर्क माध्यमे, दूरदर्शन, रेडिओ किंवा मित्र-मैत्रिणी यांच्याकडून मिळालेली माहिती/अनुभव काहीवेळेस दिशाभूल करणारी असते, सत्य असेलच असे नाही.

२. सहज शिक्षणासाठी वापरली जाणारी तंत्रे ही योग्य असतीलच असे नाही.

३. नियोजित नसते.

४. याचे परिणाम भाकित करता येत नाहीत, वेळेचा दुरुपयोग.

५. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास कमी.

६. शिस्त, दृष्टिकोन, चांगल्या सवयी यांचा अभाव.

### १.५.५ स्वयंमूल्यमापनाची प्रश्न (सहज शिक्षण)

अ) रिकाम्या जागा भरा.

१) सहज शिक्षण ................. साठी महत्त्वाचे आहे.

२) सहज शिक्षण .................... यांच्या अनुभवांमधून मिळते.

३) उजव्या हाताने जेवणे हा अनुभव ...................... मुळे मिळतो.

४) शाळेत न जाता मिळते ते ............... शिक्षण.

५) सहज शिक्षण ....................... माध्यमांमार्फत मिळते.

**उत्तरे:-**

१) जीवन कौशल्ये व मूल्ये

२) कुटुंबातील व्यक्ती, मित्र-मैत्रीणी इ.

३) सहज शिक्षणातून

४) सहज

५) समूह संपर्क, समाज.

ब) सहज शिक्षणाचे फायदे लिहा.

### १.६ उपसंहार

अशा प्रकारे या घटकामध्ये आपण औपचारिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण आणि सहज शिक्षण हे तीन शिक्षणाचे प्रकार अभ्यासले. प्रत्येक शिक्षण प्रकाराचा अर्थ, महत्त्व, वैशिष्ट्ये, घटक, मर्यादा देखील अभ्यासल्या.

## १.७ मूल्यमापनासाठी प्रश्न

१. औपचारिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, सहज शिक्षण यांची तुलना खालील मुद्यांच्या सहाय्याने करा.

अ) अर्थ, आ) अभ्यासक्रम, इ) फलित, ई) स्त्रोत, उ) ज्ञान मिळविण्याचे मार्ग, ऊ) फायदे, फ) मर्यादा.

## १.८ संदर्भ ग्रंथ

१) Internet source 'meaning and types of education.

२) इयत्ता ११वी शिक्षणशास्त्र पाठ्यापुस्तक, बालभारती, पुणे

## बी. ए. भाग–१ (शिक्षणशास्त्र)

## सत्र १ : घटक ४ ब

# शैक्षणिक विचारवंत

## प्लेटो : तात्त्विक व शैक्षणिक विचारसरणी

**घटक संरचना:**

उद्दिष्टे

प्रस्तावना

१. ऐतिहासिक पार्श्वभूमी

२. प्लेटोची ग्रंथसंपदा

३. प्लेटोचे तत्त्वज्ञान

४. प्लेटोचे शिक्षणविषय तत्त्वज्ञान

४.१ ज्ञानासंबंधीचे विचार

४.२ शिक्षणविषयक ध्येये

४.३ प्लेटोची शिक्षण योजना

४.४ प्रत्येक अवस्थेनंतरची चाचणी

**उद्दिष्टे :–** प्लेटोच्या तात्त्विक व शिक्षणविषयक विचारसरणीचा अभ्यास केल्यानंतर पुढील बाबी समजतील.

१. प्लेटोच्या तात्त्विक विचारसरणीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची माहिती होईल.

२. प्लेटोच्या ग्रंथसंपदेची माहिती होईल.

३. प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे.

४. प्लेटोच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करता येईल.

**१) प्लेटो: तात्त्विक व शैक्षणिक विचारसरणी**

**प्रस्तावना:**

पाश्चात्य संस्कृतीची जन्मभूमी ग्रीस देश होय. पाश्चात्य देशांमध्ये जे तत्त्वज्ञान निर्माण झाले. जे साहित्य व कला विकसित झाल्या त्या ग्रीसमध्येच सॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल या देशातीलच या सर्वांचीच तत्त्वज्ञान व संस्कृतीच्या क्षेत्रात हातभार होता पण तत्त्वज्ञानाची शास्त्रशुद्ध मांडणी ही प्लेटोनेच केली. म्हणून त्यांना पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा जनक म्हणतात. त्यांचे तत्त्वज्ञान आदर्शवादी असल्याने त्यास आदर्शवादाचा जनक असेही म्हणतात.

**१. ऐतिहासिक पार्श्वभूमी:–**

ग्रीक तत्त्वज्ञानाच्या रंगभूमीवर अर्थात सॉक्रेटिस व प्लेटो यांच्या पूर्वी सोफिस्ट विचारसंप्रदायास तसे तात्त्विक व नैतिक अधिष्ठान नव्हते. कोणत्याही गोष्टीची योग्यायोग्यता ठरविणे म्हणजे त्याची उपयोगिता तपासणे हाच एक आधार. म्हणजेच स्वार्थ प्रथम. याप्रमाणे सर्व तत्त्वे व मूल्यामध्येही स्वार्थच म्हणून व्यक्तिकेंद्रितता बनून समाजहित दूर राहते. शिक्षणक्षेत्रातही तेच. यामध्ये सोफिस्ट लोक उत्तम शिक्षक म्हणून शिक्षण देत. पण येथेही स्वार्थ आलाच. शिक्षणाला ध्येयच राहिले नाही. केवळ स्वार्थसंपादन हे सोफिस्ट शिक्षणाचे उद्दिष्ट. लोक यातून नीतिभ्रष्ट झाले. समाज व्यवस्था नष्टतेचा धोका उद्‌भवला. या परिस्थितीतच सॉक्रेटिस व प्लेटो जन्माला आले. समाजास तत्त्वज्ञान हवे, योग्य अधिष्ठान हवे, मूल्ये हवीत, नैतिक आदर्श हवेत, स्वार्थावर नियंत्रण हवे तरच समाज विकास होईल हे ओळखून लोकांना सॉक्रेटिस यांनी सत्य व शिव काम हे सांगण्याचा प्रयत्न केला. याचा आधार प्लेटोनेही घेतला. व समाज–विकासाला उपकारक असे तत्त्वज्ञान निर्माण केले. शिक्षणाद्वारे ते प्रत्यक्षात उतरविण्याचा व त्याद्वारे आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्याचा मार्ग सांगितला.

**२) प्लेटोची ग्रंथसंपदा :–**

राजनीती व शिक्षण हे प्लेटोच्या चिंतनाचे विषय होते. सॉक्रेटिसच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयास प्लेटोने केला. त्यांचे लिखाण संवादरूपाने प्रसिद्ध आहे. त्यापैकी रिपब्लिक हा एक ग्रंथ होय. यात राज्यशास्त्र व शिक्षण या दोन्ही बाबतीत विचार आहेत. यामध्ये आदर्श राज्याची कल्पना सांगितली आहे. तसेच हा ग्रंथ शिक्षणशास्त्र विषयावर आतापर्यंत लिहिण्यात आलेल्या यांपैकी सर्वोत्कृष्ट ग्रंथ असल्याचे रूसोने मत मांडले होते.

‘दि लॉज’ हा प्लेटोचा दुसरा ग्रंथ. यातही शिक्षण राजकारण व नीतिसंबंधी विचार आहेत. प्लेटोच्या विचारातील व्यावहारिकता या ग्रंथात प्रतीत होते.

**स्वाध्याय–१**

रिकाम्या जागी योग्य शब्द भरा/रिकाम्या जागा पूर्ण करा.

१) पाश्चात्य संस्.तीची जन्मभूमी .................... देश होय.

अ) ब्रिटन ब) ग्रीस क) इटली ड) अमेरिका.

२) 'दि लॉज' हा ग्रंथ .................... यांनी लिहिला.

अ) ॲरिस्टॉटल ब) सॉक्रेटिस क) प्लेटो ड) इर्मसन.

३) पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा जनक कोणास म्हटले जाते?

अ) सॉक्रेटिस ब) प्लेटो क) ॲरिस्टॉटल ड) थेलस.

उत्तरे : १. ग्रीस, २. प्लेटो, ३. प्लेटो

**३) प्लेटोचे तत्त्वज्ञान:–**

प्लेटोच्या तत्त्वज्ञानाची तीन प्रमुख अंगे दिसतात.

१. सत्यासंबंधी किंवा विश्वासासंबंधी कल्पना

२. मानवी मनाचे वर्गीकरण

३. ज्ञानासंबंधीची कल्पना

१) सत्यासंबंधीची प्लेटोची कल्पना –

प्लेटोने दोन जगांची कल्पना मांडली आहे.

१. वस्तूरुप जग

२. कल्पनारुप जग

१) वस्तूरुप जगाचे स्वरूप वा अस्तित्त्व हे इंद्रियानुभवावर वा इंद्रियजन्य ज्ञानावर आधारित असते. परंतु या वस्तू या सत्य नव्हेत. वस्तूचे नामरूपात्मक अस्तित्व हे इंद्रियांच्या अनुभवाला येत असले तरी ते त्यांचे सत्य स्परूप नव्हे. मूर्त वस्तूंच्या मागे त्या वस्तूसंबंधी मनात जी कल्पना येते ते तिचे सत्य स्वरूप होय. कारण वस्तू ही नाशवंत आहे तर कल्पना या अमर आहेत. वस्तूचे मूर्त स्वरूप एखाद्या वस्तूशी निगडीत असते, तर कल्पना या विशिष्ट वस्तूंपूरत्या मर्यादित नसून सर्व वस्तूंना व्यापून ही उरतात.

**उदाहरणार्थ : सुंदर वस्तू व सौंदर्य**

कल्पना या प्रथमपासूनच, जन्मत:च माणसाच्या मनात असतात. त्या मूर्त स्वरूप धारण करतात. अर्थात वस्तूरूप इंद्रियाभूत सृष्टी असत्य कल्पना रूप मनोमय सृष्टी ही सत्य. कल्पना हेच वस्तूंचे आदर्श स्वरूप. आदर्शाप्रत जाणे हा सर्वच वस्तूंचा धर्म हेच त्या वस्तूचे शिवसत्य. मनुष्यालाही हेच लागू होते. आदर्श मानव्याचे स्वरूप ओळखणे व त्याच्या कल्पनेकडे वाटचाल करणे, हे माणसाच्या जीवनाचे ध्येय. या विश्वाच्या रचनेच्या मूलाशी असणारी कल्पना, ईश्वरी शक्ती हेच सर्वश्रेष्ठ शिवसत्य आहे. हेच अंतिम सत्य.

### १.५ मानवी मनाचे वर्गीकरण :–

प्लेटो मानवी मनात तीन प्रवृत्ती असतात. यावर विश्वास ठेवतात.

**१. वासना :**

काही लोकांमध्ये वासना या अत्यंत प्रभावी असतात. शारीरिक इच्छा व देहात्मबुद्धीचे ते गुलाम ठरतात. ही मनाची सर्वात कनिष्ठ प्रवृत्ती असते.

**२. भावना :**

वासना नंतरची उच्चतम प्रवृत्ती म्हणजे भावना. भावनाप्रधान लोकांमध्ये उत्साह फार असतो.

**३. बुद्धी :**

मनाची उच्चतम प्रवृत्ती बुद्धी असते म्हणजेच विचार होय. काही लोकांची वागणूक ही बुद्धी किंवा विचारांनी प्रेरित असते.

वरील तिन्ही मनाच्या प्रवृत्तींच्या आधारे प्लेटोनी समाजातही लोकांचे तीन वर्ग गणले आहेत.

१. शारीरिक वासनांच्या आधारे वा त्यांस आहारी जाणारे, त्यांस महत्त्व देणारे लोक हे मजूर, कामकरी, कपटकरी किंवा श्रमजीवी असतात. यांचे कार्य पाहता उत्पादन करणे.

२. भावनाप्रधान लोक म्हणजे सैनिकांचा वर्ग यांचे कार्य हे समाजाचे संरक्षण करणे.

३. बौद्धिक किंवा वैचारिक पातळीवर जीवन जगणाऱ्या बुद्धिनिष्ठांना वा विचारवंतांचा वर्ग तत्त्वज्ञांचा वर्ग असतो. याचे कार्य समाजाची सर्व नियामक सुत्रे आपल्या हाती ठेवून समाजाला मार्गदर्शन करणे, समाजाचे शासन व संरक्षण करावे. प्लेटो यापुढे असेही सांगतात की, तत्त्वज्ञांमध्येच समाजातील लोकांना मार्गदर्शन करण्याची पात्रता असल्याने त्यांनाच शासक होण्याचा अधिकार आहे. अर्थात वरील वर्ग हे परंपरागत नाहीत. वर्गप्राप्त नाहीत. प्रत्येक वर्गातील व्यक्तींमध्ये निसर्गाकडून मिळालेली काही गुणवैशिष्ट्ये आहेत. परंतु त्यांनी या जन्मप्राप्त गुणांना चिकटून न राहता आपला विकास करून घेण्याचा प्रयत्न करावा व पात्रतेनुसार नियत सामाजिक जबाबदारी पार पाडावी. यालाच प्लेटो न्याय म्हणतात. न्यायी मनुष्य तोच की तो आपल्या योग्यतेप्रमाणे काम स्विकारतो. आपल्या परिने जास्तीत जास्त चांगले काम करण्याचा प्रयत्न करतो व समाजात सेवेच्या रुपात मोबदला देतो. आदर्श समाजव्यवस्था अशीच अस्तित्त्वात येईल जर प्रत्येक वर्गातील व्यक्ती न्याय पद्धतीने उत्पादन कार्य, संरक्षण कार्य व सामाजिक व्यवहारांचे नियंत्रण करतील.

### १.६ ज्ञान व ज्ञानप्राप्तीची कल्पना :–

प्लेटो ज्ञान व ज्ञानप्राप्तीची कल्पना स्पष्ट करताना गुहेचे रुपक देतात. ते पुढीलप्रमाणे.

एक गुहा आहे. गुहेच्या आतल्या बाजूला पडद्यासारखी स्वच्छ अशी पांढरी भिंत आहे. गुहेत काही लोक आहेत. त्यांचे तोंड हे भिंतीकडे आहे. त्यांना साखळदंडाने अशाप्रकारे जखडून ठेवले आहे की ज्यामुळे ते गुहेच्या तोंडाकडे-बाहेरील भागांकडे वळूनही पाहू शकत नाहीत. गुहेच्या तोंडातून प्रकाशाचा झोत येत आहे. गुहेच्या तोंडाजवळ लोकांच्या काही हालचाली चालल्या आहेत. त्यावर प्रकाश पडल्याने त्यांच्या छाया आतील पांढऱ्या भिंतीवर पडते. साखळदंडाने जड पडलेले लोक केवळ त्या छाया पाहू शकतात व त्यांनाच सत्य मानतात. सामान्य माणसाला दृश्य जगाचे जे दर्शन होते, जे ज्ञान होते ते असेच छायारूप, भासमय असते व म्हणून ते असत्य असते. गुहेतील काही लोक साखळदंडाच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी हालचाली करतात. ज्यांच्या अंगी शक्ती असते ते मान वळवून गुहेच्या तोंडाकडे पाहतात. तेव्हा त्यांना हालचाली करणाऱ्या माणसांचे सत्य दर्शन होते. आतापर्यंत दिसणाऱ्या त्यांच्या पडछाया या खोट्या होत्या. याची जाणीव त्यांना होते.

जगातही ते लोक अज्ञान, विकास वासना, देहात्मबुद्धी इत्यादी बंधनांपासून मुक्त होतात, त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीचा विकास होतो. त्यांनाच जगाच्या सत्यस्वरूपाचे दर्शन होते. हेच कल्पनांचे ज्ञान व हे ज्ञान प्राप्त करणारे हे ज्ञानी वा तत्त्वज्ञ होत. ही पात्रता जन्मजात असते. काही मर्यादित व्यक्तींनाच तिचा लाभ झालेला असतो व त्यांनाच हे ज्ञान प्राप्त होऊ शकते. ज्ञान हे शिकवून दिले जाऊ शकत नाही. असे प्लेटोचे मत होते.

**स्वाध्याय-२**

१) रिकाम्या जागा भरा.

१. सत्यासंबंधी दोन जगाची कल्पना ..................... यांनी मांडली.

अ) प्लेटो ब) ॲरिस्टॉटल क) प्रोटॅगोरस ड) हेरॅक्लिटस.

२. प्लेटोनी मानवी मनाचे वर्गीकरण ............... भागात केले आहे.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच.

३. प्लेटोने ज्ञान व ज्ञानप्राप्तीची कल्पना स्पष्ट करताना कशाचे रूपक दिले आहे?

अ) गुहेचे ब) रोपट्याचे क) झाडाचे ड) घराचे.

उत्तरे : १. प्लेटो, २) तीन, ३) गुहेची

**४. प्लेटोचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान -**

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. 'साधन' यासाठी कारण शिक्षण या साधनाद्वारे आपणास देशविकास हे 'साध्य' करावयाचे असते. समाजपरिवर्तनास गतिमानता प्राप्त व्हावयाची असेल तर शिक्षणप्रक्रियेत अमूलाग्र बदल होणे आवश्यक असते. काळानुरुप बदलणारा समाज, समाजव्यवस्था, समाज मागण्या यादृष्टीने शिक्षणाची सैद्धांतिक बाजू समजून घेणे आवश्यक आहे. शिक्षणाची सुरुवात ही बदलाच्या

जन्मापासूनच होत असते. कुटुंब, समाज, मित्रपरिवार, आधुनिक तंत्रज्ञान, साधने यांच्या अनुषंगाने बालकांपासून वृद्धांपर्यंत व्यक्तिमत्व घडत असते. त्यामुळे शिक्षणास असणारे तात्त्विक, सैद्धांतिक, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, अर्थशास्त्रीय, राजकीय अधिष्ठान समजून घेणे गरजेचे आहे. त्याबाबत विविध तत्त्ववेत्त्यांनी शिक्षणविषयक आपले विचार मांडले. त्यांच्या समाजव्यवस्थेस, काळास, विचारांस अनुरूप वा प्रतिरूप हे विचार होते. पण त्या विचारांनी तत्कालिन समाजव्यवस्था सुधारण्यासाठी प्रयत्न झाले व त्यांचा फायदा आजही होतो. यामध्ये पाश्चात्य तत्त्ववेत्ते पाहता प्लेटो, रूसो, पेस्टॉलॉझी, क्रोबेल, जॉन ड्युई, मॉंटेसरी होत. ख्रि.पू. ४२७-३४७ दरम्यानचे ग्रीक तत्त्ववेत्ते प्लेटो यांचे शिक्षणविषयक विचार पाहता ते म्हणतात-

१) Education is giving the body and soul, all the perfection of which they are susceptible

याचा अर्थ असा होतो की, मनुष्याच्या ठिकाणी असलेल्या जन्मजात शक्तींना संस्कारित करून सद्‌गुणांचा विकास करणे हे शिक्षणाचे कार्य आहे. चांगले शिक्षण तेच जे शरीर व आत्मा यांना त्यांच्या जन्मजात योग्यतेनुसार पूर्णत्वास नेते. हे पूर्णत: म्हणजे सद्‌गुण जे शिक्षणातून मिळतात. जे उदात्त वागणुकीची प्रेरणा देऊन चांगली माणसे निर्माण करते ते चांगले शिक्षण होय.

२) मुलांना सक्तीचे ज्ञान देऊ नका. कारण सक्तीने दिलेल्या ज्ञानाचा परिणाम मुलांच्या मनावर होत नाही व अपेक्षित साध्य प्राप्त होत नाही.

'सत्यम्, शिवम्, सुंदरम्' ही जीवनाची अंतिम मूल्ये आहेत. ती समजण्याची व अनुभवण्याची पात्रता मनुष्याला आणून देणारे खरे शिक्षण होय.

याचा अर्थ असा की, मुलांना सक्ती केल्याने शिक्षणाचा अपेक्षित तो परिणाम त्यांच्यावर होत नाही. म्हणून शिक्षण सक्तीचे न करता स्वतंत्र ठेवा. तरच त्याचा परिणाम दिसेल. अर्थात सक्तीपेक्षा मनापासून ती गोष्ट स्विकारली तर ती अवघड, बोजड वाटत नाही. जीवनामध्ये सत्यम्, शिवम्, सुंदरम् मूल्ये महत्त्वाची आहेत व ती केवळ शिक्षणच देऊ शकते.

३) शरीर व आत्मा यांना त्यांच्या जन्मजात योग्यतेनुसार पूर्णत्वास नेणे म्हणजे शिक्षण होय.

याचा अर्थ असा की, मुलांच्या जन्मजात शक्तींना संस्कारित करून त्यांना अनुरुप अशा सदुणांचा विकास करणे. अयोग्य गोष्टी तिरस्कार निर्माण करुन मुलांना केवळ चांगल्या व योग्य बाबीच ओळखण्यास सांगणे. मुलांमध्ये जन्मजात काही बाबी असतात. त्यांना शिक्षणाने वळण लावले पाहिजे. म्हणूनच चांगली माणसे निर्माण करणारे शिक्षण देणे गरजेचे व चांगली माणसेच समाजास पूर्णत्वास नेतात. शरीर व आत्मा यांचा मेळ घालणारे शिक्षणच मुलांना पूर्ण व्यक्तिमत्त्व प्राप्त करून देते. अर्थात शिक्षण हे मुलांवर संस्कार करते.

४) वरील व्याख्यांव्यतिरिक्त त्यांनी आपल्या विचारात असेही म्हटले आहे की, 'जे शिक्षण आदर्श नागरिक निर्माण करते तेच खरे शिक्षण होय.'

याचा अर्थ असा की, जर आदर्श समाज हवा असेल तर आदर्श शिक्षणव्यवस्था असली पाहिजे व हीचा शिक्षणव्यवस्था आदर्श नागरिक बनवू शकते. अशा अनेक आदर्श नागरिकांकडून आदर्श समाज उभारेल. समाजव्यवस्थेच्या .ष्टीने ही व्याख्या असे स्पष्ट करते की, आपल्या योग्यतेप्रमाणे प्रत्येकाने शिक्षण घ्यावे व त्यानुसार समाज कर्तव्येही पार पाडावीत. तोच खरा आदर्श नागरिक म्हणवला जाईल.

**४.१ ज्ञानासंबंधीचे विचार:–**

प्लेटो हे सॉक्रेटिसचे शिष्य. सॉक्रेटिस बरोबर वेळोवेळी जी चर्चा होत असे त्यातून प्लेटोचे स्वतंत्र असे तत्त्वज्ञान व शिक्षणविषयक मते उदयास आली. यातूनच पुढे प्लेटोने इ.स.पूर्व २८६ मध्ये 'अॅकेडेमी'ची 'गुरुकुल' ची स्थापना केली. आपल्या प्रदीर्घ आयुष्यात अंतिम घटकेपर्यंत त्यांनी ज्ञानदानाचे उत्तम कार्य केले. ते केवळ तत्त्वज्ञ, राजनीतिज्ञच न राहता शिक्षणशास्त्रही म्हणून समोर आले. म्हणूनच इमर्सन यांनी त्यांच्या संपूर्ण विचारप्रवाहास म्हटले आहे की, Plato is philosophy and philosophy is plato. खरे पाहता Republic या ग्रंथात प्लेटोनी शिक्षणविषयावर सविस्तर मत मांडले आहे. म्हणून हा ग्रंथ प्रमुख मानतात.

अनेक तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा प्रभाव असणाऱ्या प्लेटोवर मूलत: मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय प्रभावही होता. यानुसारच त्यांनी ज्ञानाच्या तीन पातळ्या मांडल्या.

**अ) पातळी पहिली श्रमजीवी वर्ग –** प्रथम पातळी ही केवळ इंद्रियानुभव वासना व देहात्मबुद्धीचे प्रभुत्व ज्या श्रमजीवी लोकांवर आहे त्यांचे ज्ञान हे इंद्रियानुभवापुरतेच मर्यादित असते असे सांगते. हे खालच्या पातळीचे ज्ञान असून त्याची मजूरवर्गाकरिता ते आवश्यक आहे. पण हे ही ज्ञान खरे ज्ञान नसते. वस्तुनिरपेक्ष नसते.

**ब) पातळी दुसरी सैनिकवर्ग भावनाप्रधान पातळी –**

प्लेटोच्या ज्ञानाच्या दुसऱ्या पातळीवर सैनिकी वर्ग जो भावनाप्रधान अर्थात भावनेच्या आहारी जाणारे असे लोक समाविष्ट होतात. सैनिकवर्ग हा भावनाप्रधान असल्याने त्यांना श्रमजीवी वर्गापेक्षा श्रेष्ठ प्रकारचे ज्ञान देणे आवश्यक असते. भावनांद्वारे प्राप्त होणारे ज्ञान ज्याला प्लेटो 'मत' असे म्हणतात. पण मते ही वैयक्तिक असल्याने तसेच ती परिवर्तनशील असल्याने हे ही ज्ञान खरे नाही. व्यक्तींच्या भावनाच बदलल्या असल्याने भावनाधिष्ठीत ज्ञानही बदलते ठरेल म्हणून त्याचा सर्वमात्र स्विकारही करता येणार नसल्याने खरे ज्ञान मानता येणार नाही.

**क) पातळी तिसरी : तत्त्वज्ञ–वैचारिक पातळी–**

खरे ज्ञान हे वस्तूनिरपेक्ष असते व ते विवेकबुद्धीनेच मिळते. खरे ज्ञान हे इंद्रियानुभवातीत, अमूर्त व वस्तुनिरपेक्ष असते. ते मनाच्या सुप्तावस्थेत असते. यालाच कल्पनांचे ज्ञान म्हणतात. हे ज्ञान बुद्धी विचार व

विवेक याद्वारे मिळते. हे बाह्य सृष्टीत मिळत नाही. ज्या व्यक्तींमध्ये विशेष अशी बौद्धिक पात्रता असेल त्यांच्याच मनात ते जागृत होते. अशी पात्रता असलेला वर्ग विचारवंतांचा, तत्त्वज्ञांचा वर्ग होय. तीव्र बुद्धिमत्ता असलेल्यांनाच ते प्राप्त होते. हे सर्वश्रेष्ठ ज्ञान असून समाजातील वैचारिक पातळीवर जीवन जगणाऱ्या तत्त्वज्ञ वर्गालाच ते प्राप्त करता येते. या ज्ञानाच्या साहाय्याने प्रत्येक वस्तूचे सत्य स्वरूप समोर आणता येते. शाश्वत गुणवैशिष्टे व पूर्णत्वाचे दर्शन होते.

प्लेटो ज्ञान व सद्‌गुण यात फरक करतात. सद्‌गुणांचे वर्गीकरण त्यांनी बुद्धिमत्ता, साहस, संयम व न्याय असे केले आहे. ज्ञानाचा संबंध सदाचाराशी जोडला पाहिजे. श्रेष्ठत्तम ज्ञान म्हणजे ज्ञानाची सदाचारात परिणती होय. या दृष्टीने प्लेटोने आपल्या आदर्श राज्य व्यवस्थेत सदाचारी नागरिक निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षणावर सोपविली आहे.

**४.२ शिक्षणविषयक ध्येये :**

आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्याचे एक साधन म्हणून जेव्हा शिक्षणाकडे प्लेटो पाहत होते तेव्हा त्यांनी शिक्षणविषयक अशी ध्येये सांगितली.

**अ. जन्मजात गुणांचा विकास करणे :**

प्लेटो सांगतात की, व्यक्तीमध्ये जन्मत: काही गुण असतात. अशा विद्यमान गुणांचा विकास करणे हेच शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. उदा. ज्ञानाचा शोध घेणे, कार्यप्रवण राहणे, समाजसेवा करणे, पात्रता शोधणे, इ. विद्यमान प्राप्त गुणांचा शोध घेऊन त्यावर शिक्षणाने भर दिला तर आदर्श समाजास हवा असणारा व्यक्ती मिळेल व त्यातून आदर्श समाज उभारेल.

**ब. बुद्धिमान लोकांचा शोध घेणे :**

शिक्षणाचे खरे ध्येय हे बुद्धिमान लोकांचा शोध घेवून त्यांना शिक्षण दिले पाहिजे. त्यांच्या बुद्धिचा फायदा समाजिक कार्यात घेता येईल. बुद्धिमान लोकांना ज्ञान देऊन समाजाला मार्गदर्शन करण्याची पात्रता त्यांच्यात निर्माण करणे हीच शिक्षणाची खरी जबाबदारी असे प्लेटो म्हणतात. बुद्धिमानांनी त्यांच्या बुद्धिचा वापर समाज समस्या शोधून त्या सोडवण्यासाठी केला तर समाज सुधारेल, विकास होईल आणि विकास झालेल्या समाजातच राज्यव्यवस्था नियंत्रित राहिल. या दृष्टीने पाहता शिक्षणाचे ध्येय केवळ बुद्धिचा विकास करणे राहिले नसून ते समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्यही शिक्षणाचे राहिले.

**क. नागरिकत्व निर्माण करणे :**

प्लेटोच्या मते, आदर्श समाजव्यवस्था जर निर्माण करावयाची असेल तर आदर्श नागरिक निर्माण केला पाहिजे. आदर्श नागरिक तोच की जो आपल्या योग्यतेनुसार शिक्षण घेईल व त्यानुसारच समाजसेवेची जबाबदारी पार पाडेल. त्याच गुणांचा विकास व पालन करील. आपल्या अंतर्गत योग्यतेनुसार प्राप्त झालेल्या वर्गासाठी नियत केलेली कर्तव्ये पार पाडील. म्हणजेच व्यक्तीभोवती फिरणारे शिक्षण न राहता आदर्श नागरिक जो समाजाशी संबंधित आहे असा नागरिक निर्माण करण्याचे ध्येय शिक्षणात असावे.

**ड. तत्त्वज्ञ–शासक निर्माण करणे :**

प्लेटोच्या मते, विज्ञान वा गणित या विषयातून खऱ्या सत्याचे दर्शन होत नाही. तत्त्वज्ञानातून सत्याचे यथार्थ दर्शन होते. पण तत्त्वज्ञानापर्यंत अर्थात यथार्थ सत्याचे ज्ञान अल्पसंख्य लोकांनाच होत होते. समाजात हेच लोक तत्त्वज्ञ–शासक राहतील. असे शासक निर्माण करण्याचे कार्य शिक्षणाचे आहे. शासकांना यथार्थ सत्य तत्त्वज्ञानच देते व असे सत्य प्राप्त झालेलेच समाजास प्रकाशात नेण्याचे काम करतात. तेव्हा शिक्षणाचे उद्दिष्ट तत्त्वज्ञ–शासक निर्माण करणे असावे.

**४.३ प्लेटोची शिक्षण–योजना :**

शिक्षण हे केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक बनवावयाचे असेल तर तशी योजना सुद्धा हवी हे ओळखून प्लेटोनी पुढीलप्रमाणे शिक्षण योजना मांडली. यालाच शिक्षणाच्या अवस्था ही म्हणतात. ज्या बालकांच्या, मुलांच्या वयानुसार बदलतात.

अवस्था–१: वय ०–७ वर्षे

अवस्था–२: वय ७–१६/१७ वर्षे

अवस्था–३: वय १६/१७–२० वर्षे

अवस्था–४: वय २० ते ३० वर्षे

अवस्था–५: वय ३० ते ३५ वर्षे

अवस्था–६: वय ३५ वर्षे ते ५० व नंतर

**अवस्था–१: वय ०–७ वर्षे:**

या वयात मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी पालकांची राहते. मुल कुटुंबात जन्मते, वाढत असते. त्याचा विकास होत असतो. विकासाचे प्रथम साधन हे कुटुंब ठरते व यामध्ये त्याचे पालक प्रथम येतात. या वयातील मुलांची 'खेळ' ही नैसर्गिक प्रवृत्ती असते. खेळातून शरीर सदृढ बनते व मनही सदृढ, निकोप राहते. खेळांच्याद्वारे त्यांच्या भावी आयुष्यातील विकासाची पायाभरणी होते. ही पायाभरणी करण्यात शिक्षण भूमिका बजावते. पालकांच्या सहवासात राहून मुल शिक्षण घेणार असल्याने ते खेळही मुलाच्या भविष्यात उपयोगी ठरावेत. त्या माध्यमांतून मुलांवर प्रेमाचा वर्षाव करणे व त्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे हे शिक्षणाचे ध्येय असावे.

**अवस्था–२: वय ७–१६/१७ वर्षे**

या वयात लेखन, वाचन, गणित यांच्या अध्यापनापासून प्रारंभ व्हावा परंतु त्यावर अधिक भर देऊ नये. त्याची सक्तीही करू नये. त्याहीपेक्षा शारीरिक व मानसिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय म्हणजे

व्यायाम किंवा शारीरिक शिक्षण व संगीत हे दोन विषय मात्र सक्तीचे असावेत. व्यायामातून शरीराचा विकास होईल तर संगीतातून मनाचा वा आत्म्याचा. त्यातही प्रारंभ मानसिक विकासापासून म्हणजे संगीतापासून करावा. कारण आत्म्याचा विकास हा अधिक महत्त्वाचा. दोन्हीही विषयांचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे मानसिक विकास होय. हे दोन्ही विषय न विभागता अभ्यासक्रमात समान स्थान देऊन शरीर व मन यांत सुसंवाद प्रस्थापित करावा. या सुसंवादातून न्याय गुणांचा विकास होईल असे प्लेटोचे मत होते.

तसे पाहता प्लेटोला अभिप्रेत असणारा संगीत या शब्दाचा अर्थ व्यापक होता. त्यात गीते, कथासाहित्य व नृत्य या तिन्हींचा समावेश असावा. नृत्यातून शरीरास व्यायाम मिळतो शिवाय शरीरास प्रमाणबद्धता, चपलता, आकर्षकता व सौंदर्य प्राप्त होते. मुलांसाठीचे वाङ्मय हे नैतिक मुल्यांचा पुरस्कार करणारे देवता, धर्म, स्वर्ग व थोर पुरुष यांच्याबद्दल त्यांच्या मनात आदरभाव निर्माण करणारेच ते असावे असे प्लेटो म्हणतात. या साहित्यात देव किंवा दैव निष्ठुर आहे, अन्यायी आहे, जगात सज्जनांचा छळ होतो. त्यांना दु:ख भोगावे लागते अशी चित्रे आहेत ती साहित्ये शिकवू नये. कारण त्यामुळे सद्गुण, सज्जनता व नीतिमत्ता यांवरील त्यांची श्रद्धा नष्ट होईल. भावनोत्कट किंवा भावाविवश साहित्य शिकविण्यासही विरोध केला. कारण तसे साहित्य वाचल्याने मुलांमध्ये विकारवासना उत्तेजित होतील व आत्मसंयम या गुणांच्या विकासात ते बाधक ठरेल. वीर पुरुषांविषयी आदर कमी होणारे साहित्य निवडू नये. म्हणून साहित्याची निवड तज्ज्ञांकडून फार काटेकोरपणे व चिकित्सकपणे करण्यात यावी. याबाबत शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य देऊ नये असे प्लेटो सांगतात.

**अवस्था–३: वय १६/१७ ते २० वर्षे –**

या कालखंडात मुलांना लष्करी शिक्षण देण्यात यावे. परंतु त्यात केवळ शारीरिक विकास व विविध युद्धकलांचे ज्ञान देण्यावरच भर नसावा तर शौर्य, धैर्य व सहनशीलता या गुणांचा विकास होईल असा त्यात प्रयत्न व्हावा. म्हणूनच प्लेटोने याही अवस्थेत लष्करी शिक्षणालाच संगीत व साहित्याची जोड द्यावी असे म्हटले. अन्यथा व्यक्तीच्या अंगी केवळ पारावी सामर्थ्य निर्माण होण्याची शक्यता अधिक वाढेल. केवळ शारीरिक शक्तीचा संचार न करता मानसिक शक्तीही वाढवता आल्या पाहिजेत.

**अवस्था–४: वय २० ते ३० वर्षे –**

वयाच्या विसाव्या वर्षापासून उच्च शिक्षणास प्रारंभ होतो. त्यांच्या अंगी पात्रता असेल त्यांनीच उच्च शिक्षण घ्यावे. हेच खरे बौद्धिक शिक्षण प्रारंभी अंकगणित, भूमिती, खगोलशास्त्र व संगीत हे विषय विद्यार्थ्यांना शिकविले जावेत. या अवस्थेतील शिक्षणाचा उद्देश फक्त ज्ञानविकास नसून, वस्तूरुप जगाकडून सत्य स्वरूपाकडे नेणे हा होय. अंकगणितातील अंक व भूमितीतील आकृत्या यांच्या अभ्यासाने अमूर्त विचारशक्तीचा विकास होतो. बुद्धी तिक्ष्ण व सरल होते. खगोलशास्त्र विचारशक्ती व तर्कशक्ती विकसित करते. बुद्धी सत्याचा शोध घेते. संगीत ही शिकविण्यात यावे परंतु वयोगटानुसार त्याची साहित्य पातळी वाढवावी. सर्वच विषय वैज्ञानिक पद्धतीने शिकविल्याने विद्यार्थ्यास बौद्धिक शिस्त लागते, शोधाची वृत्ती

दिसते. यापेक्षाही अजून कोणामध्ये शिक्षण घेण्याची पात्रता असेल ते अजून पुढे शिकतील. बाकीचे सामाजिक कार्याची जबाबदारी उचलून समाजास आदर्श बनवतील.

**अवस्था–५: वय ३० ते ३५ वर्षे**

प्लेटोच्या मते, ही सर्वोच्च शिक्षणाची अवस्था आहे. यामध्ये महत्त्वाचा विषय म्हणजे तत्त्वज्ञान होय. यासच प्लेटो Didlectics म्हणतात. २० ते ३० पर्यंत ज्या-ज्या विषयांचा अभ्यास केला ती तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची केवळ पूर्वतयारी. खरा अभ्यास तर या वयामध्ये होतो. विज्ञान वा गणित म्हणजे तत्त्वज्ञान नव्हे. तत्त्वज्ञान यापेक्षाही श्रेष्ठ आहे. कारण याच्या अभ्यासातून शाश्वत, अंतिम सत्याचे ज्ञान होऊ शकते. विज्ञान व गणितात काही गृहितकृत्ये मान्य करून पुढे जावे लागते. परंतु तत्त्वज्ञान हाच असा विषय आहे जो गृहित. त्यांचा आधार सोडून सत्यशोधार्थ चिंतन करता येतो. निरनिराळ्या विषयांचे श्रेष्ठत्व स्पष्ट करताना प्लेटो म्हणतात, व्यवसायांचा उद्देश उत्पादन हा असल्यामुळे संबंध मनुष्याच्या इच्छा-वासनांच्या तृप्तीशी असतो. गणितास वैज्ञानिक विषयातून सत्याची थोडीशी कल्पना येईलही. पण सत्याचे यथार्थ दर्शन घडविणारा विषय तत्त्वज्ञानच आहे. व असे उच्चतम ज्ञान प्राप्त करणारे लोक फार कमी असतात.

**अवस्था–६ : ३५ ते ५० व नंतर**

शिक्षण ३५ वर्षे वयानंतर समाप्त होईल. तयार झालेले हे तत्त्वज्ञ समाजातील उच्च अधिकारपदे स्वीकारतील व समाजव्यवहारांचे संचालन करतील. ५० वर्षे वयापर्यंत म्हणजे १५ वर्षे ते समाजसेवा करतील. त्यानंतर ते निवृत्त होतील. निवृत्तीनंतरचे आयुष्य आत्मचिंतन व परमोच्च सत्याच्या चिंतनात घालवावा व ज्याठिकाणी आवश्यक आळे तिथेच मार्गदर्शनासाठी यावे.

## ४.४ प्रत्येक अवस्थेनंतर चाचणी

प्रत्येक व्यक्तीला योग्यतेनुरूप शिक्षण व समाजसेवेचे कार्य हे प्लेटोप्राचीन योजनेचे महत्त्वाचे सूत्र आहे. त्यानुसार वर दिलेल्या प्रत्येक अवस्थेनंतर विद्यार्थ्यांची चाचणी होत जाईल. ज्यांच्या अंगी पुढील शिक्षणाची पात्रता असेल ते शिक्षण चालू ठेवतील. त्यांच्याकडे ती पात्रता नसेल ते योग्य अशा दुसऱ्या कार्याची जबाबदारी अंगावर घेऊन समाजसेवा करतील.

उदाहरणार्थ : १७ व्या वर्षीच्या शेवटी गळणारे विद्यार्थी शिक्षण सोडून उत्पादक व्यवसायाकडे वळून समाजसेवा करतील. २० व्या वर्षी शिक्षण सोडणारे सैनिक बनून समाजाचे संरक्षण करतील. २०-३० वर्षात शिक्षण घेणारे बुद्धिमान लोक समाजातील किंवा शासनयंत्रणेतील सामान्य अधिकारपदाच्या जागा स्विकारून अनुरूप कार्य करतील. तर ३५ वर्षापर्यंत शिक्षण घेणारे तत्त्वज्ञ सर्वश्रेष्ठ अधिकारपदांवर येऊन समाजाचे संचालन करतील. या दरम्यान शिक्षणपद्धतीत कोठेही स्त्री व पुरुष असा भेद केलेला नाही. प्लेटोच्या मते स्त्री व पुरुष यांच्यात लिंगभेद वगळता बौद्धिक पात्रतेत कोणताही फरक नाही. म्हणून त्यांच्या मते स्त्रियांना सर्व विषय शिकविण्यात यावे अगदी युद्धकलाही.

**स्वाध्याय -३**

१. जीवनात 'सत्यं, शिवंम्, सुंदरम्' अशी मूल्ये महत्त्वाची आहेत असे कोण म्हणाले?

अ) ॲरिस्टॉटल ब) पेस्टॉलॉजी क) रूसो ड) प्लेटो

२. प्लेटोच्या मते ज्ञानाची संबंधी दुसरी पातळी ही ............. प्रधान पातळी होय.

अ) वासना ब) भावना क) बुद्धि ड) यापैकी नाही

३. प्लेटोची शिक्षणयोजना किती अवस्थांत विभागली आहे.

अ) ५ ब) ६ क) ७ ड) ८

उत्तरे : १) प्लेटो, २) भावना, ३) ६

**थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. प्लेटोच्या तत्त्वज्ञानाची तीन प्रमुख अंगे स्पष्ट करा.

२. प्लेटोची सत्यासंबंधीची कल्पना

३. प्लेटोच्या मते शिक्षणाची ध्येये

४. प्लेटोने शिक्षणाच्या सांगितलेल्या व्याख्या स्पष्ट करा.

५. प्लेटोचे ज्ञानासंबंधीचे विचार

६. प्लेटोने दिलेली प्रत्येक अवस्थेनंतरची चाचणी.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. प्लेटोची तात्त्विक विचारसरणी उदाहरणासहित स्पष्ट करा.

२. प्लेटोचे शिक्षणविषयक विचार स्पष्ट करा.

३. प्लेटोची शिक्षणयोजना सविस्तर सांगा.

**अधिक वाचनासाठी पुस्तके**

कुंडले, म. भा. (१९९८) शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवारपेठ, पुणे-३०.

पवार, ना. ग. उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षणतज्ज्ञ, नूतन प्रकाशन, २१८१, सदाशिव पेठ, पुणे-३०.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (१९९४) शिक्षणाचे तात्त्विक, सामाजिक, सांस्कृतिक मार्गदर्शन भाग-१ प्रिंट लाईन्स बी ८१/१, ए रोड, नाई, सातपूर, नाशिक.

❑❑❑

## बी. ए. भाग–१ (शिक्षणशास्त्र)

## सत्र १ : घटक ४

# शैक्षणिक विचारवंत

## रविंद्रनाथ टागोर : तात्त्विक विचार आणि शैक्षणिक योगदान

**घटक संरचना:**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ विषय विवेचन

रविंद्रनाथ टागोरांचे तात्त्विक विचार

रविंद्रनाथ टागोरांचे शैक्षणिक योगदान

४.४ सारांश

४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

४.६ स्वयंअध्ययन अध्ययन उत्तरे

४.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

### ४.१ उद्दिष्टे:

या घटकाच्या अभ्यासानंतर,

१. रविंद्रनाथ टागोरांचे तात्त्विक विचार आपणास माहित करून घेता येईल.

२. रविंद्रनाथ टागोरांचे अभ्यासक्रम, विषय दृष्टिकोन जाणून घेता येईल.

३. रविंद्रनाथ टागोरांचे अध्ययन अध्यापन पद्धती विषयक मते जाणून घेणे.

४. रविंद्रनाथ टागोरांचे विद्यार्थ्यांची व शिक्षकांची भूमिका या विषयक दृष्टिकोन समजून घेता येईल.

### ४.२ प्रस्तावना:

रविंद्रनाथ टागोर हे केवळ उच्च दर्जाचे तत्त्वज्ञ आणि कवी नव्हते तर महान शिक्षणशास्त्रज्ञही होते. गुरुदेव रविंद्रनाथ टागोरांचा जन्म दि. ६ मे १८६१ मध्ये कलकत्त्यात झाला. वडिलांबरोबरच्या भारतभ्रमणास

गेले असता चार भिंतींच्या आतले शिक्षण किती निरस असते याची जाणीव त्यांना प्रकर्षाने झाली आणि तेव्हापासून त्यांना शिक्षणाच्या अभिनव स्वरूपाचा ध्यास लागला. रविंद्रनाथांनी विविध साहित्यकृती निर्माण केल्या. आपल्या शैक्षणिक विचारांना मूर्त रुप देण्यासाठी व कल्पनेतील शिक्षणप्रणाली निर्माण करण्यासाठी त्यांनी १९०१ मध्ये 'शांतिनिकेतन' ही संस्था निर्माण केली. १९२१ मध्ये विश्वभारती व १९२२ मध्ये श्रीनिकेतन निर्माण केले.

रविंद्रनाथ टागोरांची भारतीय संस्कृतीवर श्रद्धा होती. भारतीय अध्यात्माचा त्यांच्यावर प्रभाव होता. निसर्गाविषयी व मानवतेविषयीची श्रद्धा टागोरांनी मांडलेल्या त्यांच्या तात्त्विक विचारांवर व शैक्षणिक योगदान यावर प्रभाव आढळून येतो.

**४.३ रविंद्रनाथ टागोरांचे तात्त्विक विचार:**

रविंद्रनाथ टागोरांच्या जीवनाचा त्यांच्या तात्त्विक विचारांवर प्रभाव आढळून येतो. टागोर हे निसर्गवादाचे पुरस्कर्ते होते. विश्वात्मकता व मानवता या मूल्यांवर आधारित त्यांचे तात्त्विक विचार आढळून येतात. ते खालीलप्रमाणे–

१. निसर्ग हाच खरा गुरु आहे.

२. आत्म प्रकटीकरण हेच खरे स्व शिक्षण.

३. सर्वामध्ये प्रेमभाव वृद्धिंगत केल्यामुळे आत्मिक विकास साधता येतो.

४. सृष्टीतील कणा कणात ईश्वर व्यापून आहे. निसर्ग व मानव हा सृष्टीचाच भाग आहेत.

५. मनुष्याने सृष्टीशी व निसर्गाशी तादात्म्यक्ता साधावी.

६. मानवता धर्माचा पुरस्कार रविंद्रनाथ टागोरांनी केला आहे.

७. परम सत्याच्या शोधासाठी ध्यास घ्यावा.

८. शाश्वत सौंदर्याची अनुभूती घ्यावी.

९. सत्य शिव सुंदरची अनुभूती मनुष्याला देवत्वाचा साक्षात्कार करून देते.

१०. आध्यात्मिक ज्ञानाबरोबर ऐहिक जगाचे ज्ञानही आवश्यक.

११. एकात्मतेच्या तत्त्वाचा पुरस्कार केला.

१२. मनाचा उत्कर्ष हा वैश्विक मानव्याकडे दिग्दर्शित व्हावा.

**४.४ रविंद्रनाथ टागोरांचे शैक्षणिक योगदान:**

रविंद्रनाथ टागोर हे तत्कालिन शिक्षणप्रणालीत कधी रमलेच नाहीत. बंदिस्त शाळेची संकल्पना त्यांना मान्य नव्हती. टागोरांचा समग्र व समृद्ध दृष्टीकोन त्यांच्या शैक्षणिक योगदानांतून स्पष्ट होतो.

रविंद्रनाथ टागोरांचे शैक्षणिक योगदान आपण टागोरांना अभिप्रेत असलेली शिक्षणाची संकल्पना, शिक्षणाची उद्दिष्टे, अभ्यासक्रम, अध्ययन अध्यापन पद्धती, शिक्षक व विद्यार्थ्यांची भूमिका व मूल्यमापन यासंदर्भात पाहणार आहोत.

**४.४.१ शिक्षणाची संकल्पना:**

१. विश्वातील सर्व प्राणीमात्रांविषयी प्रेमभाव निर्माण करते ते खरे शिक्षण.

२. निसर्गाच्या कुशीतून मुलांना ओढून कृत्रिम वातावरणात मिळणारे शिक्षण खरे शिक्षण नाही.

३. Education is permanent part of adventure of Life.

४. खरे शिक्षण हे केवळ ज्ञानच देत नाही तर मनुष्याच्या जीवनाची संपूर्ण विश्वाशी सुसंगती लावून देते.

५. जीवन व शिक्षणामध्ये रविंद्रनाथ फरक करत नाहीत. शिक्षणातून जीवन फुलत राहिले पाहिजे ही त्यांची भूमिका.

**४.४.२ शिक्षणाची ध्येये:**

**१) स्वजाणीव:** अंतमूर्ख होऊन स्वत:कडे असलेल्या क्षमतांची जाणीव करून देणे.

**२) शारीरिक विकास :** Healthy mind lives in a Healthy body या उक्तीप्रमाणे बालकाच्या शारीरिक विकास ध्येय टागोरांनी मांडले. बालकाला निसर्ग वातावरणात मुक्त वावरू देणे, विविध शारीरिक कृती व खेळ खेळण्याचे स्वातंत्र्य असावे. जेणेकरून बालके शारिरीकदृष्ट्या सुदृढ होतील.

**३) प्रत्यक्ष जीवनातून शिक्षण:** केवळ पुस्तकी ज्ञान जीवनाचे खरे स्वरूप माहित होण्यास उपयुक्त ठरत नाही. म्हणून मुलांना स्वत:ला अनुभव घेता आला पाहिजे, त्यातून वास्तव जीवन जाणून घेणे हे खरे शिक्षण. म्हणूनच व्याकरणाच्या नियमातून भाषा शिकण्यापेक्षा कथा, काव्य, नाट्यीकरणातून भाषा विद्यार्थ्यांना लवकर शिकता येईल. कारण कथा, काव्य व नाटकाचा प्रत्यक्ष जीवनाशी येतो.

**५) निसर्ग सान्निध्यातून शिक्षण:** निसर्गात मुले मुक्तपणे शिकतात, पूर्ण स्वातंत्र्याचा त्यांना आस्वाद घेता येतो, मुलांना निसर्गसान्निध्यात मुक्त संचार करू द्यावा. हा सुखद अनुभव मुलांना अनुभवाने समृद्ध करण्यात मदत करतो.

**५) सृजनशीलतेचा विकास:** बालकाच्या उपजत सृजनशीलवृत्तीला प्रोत्साहन द्यावे. संगीत, नाट्य, नृत्य, चित्रकला यासारखे विषय शिक्षणाने बालकाला उपलब्ध करून दिले पाहिजे.

**६) आत्माविष्कार:** मुलांना स्वत:ला अभिव्यक्त होण्यास संधी मिळायला हवी. आत्मानुभव मुलांच्या आत्माविष्कारास प्रोत्साहन देतो. हे लक्षात घेवून मुलांना स्वत:ला अनुभव घेण्यास अनुकूल परिस्थिती प्राप्त करून द्यावी.

**६) नैतिक आणि आध्यात्मिक विकास:** शिक्षणाने मुलांमध्ये सहिष्णुता, सहानुभूती, प्रेम, सदाचारण या आध्यात्मिक गुणांचा विकास बालकांमध्ये करायला हवा.

**७) वैश्विक एकात्मता:** शिक्षणाचा गाभा विश्वात्मकतेवर आधारित असला पाहिजे व वैश्विक एकात्मता रुजविणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

वरील शैक्षणिक ध्येये साध्य करण्यासाठी अभ्यासक्रम कसा असावा. हे खालीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहे.

**४.४.३ अभ्यासक्रम:**

संपूर्ण वैश्विक मानव निर्माण करणे टागोरांना अपेक्षित होते. शारीरिक, मानसिक, भावनिक, आध्यात्मिक व नैतिक विकासांवर भर देणारा अभ्यासक्रम टागोरांना अपेक्षित होता. यासाठी अभ्यासक्रम हा जीवनाशी सुसंगत, कृतीआधारित व वास्तव असावा व अभिव्यक्तीला वाव देणारा असावा. अभ्यासक्रम हा मातृभाषेतून असावा. यामध्ये विविध विषयांचा समावेश टागोरांनी केला आहे. यामध्ये टागोरांनी मातृभाषा, संस्कृत, इंग्रजी, विज्ञान, इतिहास, भूगोल, निसर्ग, साहित्य, संगीत नृत्य व कला या विषयाचा समावेश असावा. तसेच, कृतीशील कार्यक्रमामध्ये, त्यांनी नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, बागकाम, शेती, समाजसेवा व प्रयोगशाळा कार्य हे असावे अशी अपेक्षा केली आहे. तसेच सृजनशील व सांस्कृतिक विषय जसे, नृत्य, गायन, शिवणकला व कुकिंग यासारखे विषय असावेत व विद्यार्थ्यांना पूर्ण स्वातंत्र्य देणारा अभ्यासक्रम असला पाहिजे.

**४.४.४ अध्ययन–अध्यापन पद्धती:**

मुलांना अध्ययनात आनंद मिळेल, त्यांच्या नैसर्गिक अभिरुची व स्वाभाविक प्रवृत्तींना पोषक असणाऱ्या अध्यापन पद्धतीचा वापर शिक्षकांनी करावा असे टागोरांनी सुचित केले आहे.

**निरीक्षण पद्धती:** निसर्गातील व परिसरातील घटनांचे, निरीक्षण करायला देणे.

**भ्रमण पद्धती:** निसर्गाच्या सान्निध्यातून प्रत्यक्ष अनुभूती देते.

**चर्चा पद्धती**: जीवनाशी निगडीत चर्चा मुलांना तार्किक विचार करण्याची प्रेरणा देते व आवश्यक ज्ञानाची प्राप्ती होते.

**प्रश्नोत्तर पद्धती:** योग्य प्रश्न विचारणे व अचूक उत्तर देणे प्रभावी अध्ययनासाठी आवश्यक असावे.

**कृतीशील पद्धती:** अध्ययनास गती मिळते.

**क्रीडन पद्धती:**

**शिक्षक भूमिका:**

१. शिक्षकाने मुलांशी सहानुभूतीपूर्वक व प्रेमाने वागावे.

२. शिक्षकाने पुस्तकी शिक्षणापेक्षा कृतीतून शिकण्यास प्रोत्साहन द्यावे.

३. मुलांना स्वानुभवातून शिकण्यास प्रोत्साहन द्यावे.

४. बालकांच्या पावित्र्यावर शिक्षकाचा विश्वास हवा.

५. शिक्षक स्वत: ज्ञानवंत असला पाहिजे.

६. शिक्षक हा मुलांच्या मनोविकासाचा व आवडीनिवडी जाणून घेणारा असला पाहिजे.

७. मुलांना कडक शिक्षा न करता, त्यामागची कारणे समजून घेवून उपाययोजना करायला हवी.

८. शिक्षकाने नेहमी विद्यार्थ्यांना उपयुक्त व रचनात्मक कृतीमध्ये विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवावे व प्रेरणा द्यावी.

९. सर्वसमावेशक वातावरण निर्माण करणारा असावा.

**४.४.५ विद्यार्थी भूमिका:**

विद्यार्थी हा थोरांचा सन्मान करणारा व आज्ञापालन करणारा व नम्रतेने वागणारा असावा. केवळ पुस्तकाचा आधार न घेता निरीक्षण, स्वअध्ययन, स्वानुभव यांच्या साहाय्याने ज्ञान संपादन करावे. मुलांनी स्वयंप्रेरणेने शिस्तीचे पालन करावे.

मनुष्य आणि निसर्ग हे परस्परांशी अतिशय दृढ बंधाने संलग्नित आहे. या तत्त्वानुसार मुलांच्या मनातील नैसर्गिक भावनांचा विकास करणारा निसर्गवाद रविंद्रनाथ टागोरांना अपेक्षित होता.

**४.४ सारांश:**

या घटकात आपण रविंद्रनाथ टागोरांचे निसर्गवादी तत्त्वज्ञ म्हणून तात्त्विक विचार पाहिले. या मध्ये विद्यार्थ्यांचा आत्माविष्कार करणे, बालकाचा शारीरिक व आध्यात्मिक विकास करणे, निसर्ग हाच गुरु, आत्मप्रकटीकरण, मानवताधर्म, यासारख्या तत्त्वज्ञानावर रविंद्रनाथ टागोरांनी भर दिला आहे. तसेच, शिक्षणाची संकल्पना, शिक्षणाची ध्येये, अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन पद्धती, शिक्षक व विद्यार्थी भूमिका या मुद्यांच्या मदतीने रविंद्रनाथ टागोरांचे शैक्षणिक योगदान अभ्यासले.

**४.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न:**

१. रविंद्रनाथ टागोरांना अपेक्षित 'अभ्यासक्रम' संकल्पना कोणती आहे?

२. विद्यार्थी शिस्तीसंदर्भात कोणती शिस्त टागोरांना अपेक्षित आहे?

३. टागोरांच्या मते, अभ्यासक्रमात कोणते विषय समाविष्ट असावेत?

४. रविंद्रनाथ टागोरांनी मांडलेली शिक्षणाची दोन ध्येये सांगा.

### ४.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे:

१. अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांना नैसर्गिक प्रवृत्तींना प्रेरणा देणारा, अनुभव आधारित, कृतीशील व जीवनाशी निगडीत असावा.

२. स्वयंशिस्त.

३. अभ्यासक्रमात, मातृभाषा, संस्कृत, इंग्रजी, विज्ञान, इतिहास, भूगोल, निसर्ग, साहित्य, संगीत, कला या विषयांचा समावेश असावा.

४. आत्माविष्कार व सृजनशीलतेचा विकास करणे.

### ४.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ:-

१. रविंद्रनाथ टागोरांचे तात्त्विक विचार स्पष्ट करा.

२. रविंद्रनाथ टागोरांच्या निसर्गवादानुसार 'अध्ययन-अध्यापन पद्धती' स्पष्ट करा.

३. रविंद्रनाथ टागोरांना अपेक्षित शिक्षक व विद्यार्थी भूमिका स्पष्ट करा.

### ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके:-


- नवभारतीय समाजातील शिक्षक व शिक्षण: प्रा. कुलकर्णी: प्रगती बुक्स प्रा. लि. पुणे
- जागतिक शिक्षणतज्ज्ञ: प्रा. प्रतिभा सुधीर फडके: विद्या प्रकाशन नागपुर
- भारतीय समाजातील शिक्षण: सुट्टीतील बी. एड्. अभ्यासक्रमाची स्वाध्यायपुस्तिका: शिक्षणशास्त्र विभाग: शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर